# सारांश

फार पूर्वी संगीत हे दरबारात, गणिकाच्या महाली व कीर्तर्नकार, कीर्तन प्रवचनातून ऐकायला मिळत होते. त्याकाळी संगीत विद्यालये नव्हती. संगीत हे फक्त गुरूमुखातूनच शिकता यायचे गुरूला प्रतिप्रश्न करण्याची सुद्धा मुभा नव्हती शिकत शिकत असलेल्या रागाचे नावही माहिती करून घेता येत नसे. अशा परिस्थितीत स्वरलेखन, स्वरलिपी ह्या फारच दूरच्या गोष्टी.

संगीत हे सामगायनातूनच उगम पावलेले आहे. अध्ययनाप्रमाणेच वेदाध्ययन सुद्धा गुरूमुखीच आहे. त्यासाठी मंत्रोच्चारण शिकावे लागते. त्याच्या संकेतावरून ती कल्पना येत असे. अशाच संकेतावरून स्वरलिपीचा उगम झाला.

गुरूमुखातून शिकलेल्या बंदीशीचे जतन करून ठेवण्यास स्वरलिपीचा उपयोग होतो. स्वरलिपी व स्वरलेखनाचे मुख्य उद्दीष्टच मूळी कलेचे जतन करणे आहे. त्यामुळे त्या बंदीशी जीवंत ठेवता येतात. बंदीश स्मरणात राहावी किंवा विसरलेली बंदीश पुन: आठवणीत यावी या उद्देशाने स्वरलेखनाचे विशेष महत्व आहे.

स्वरलिपी किंवा स्वरलेखनाच्या कार्यात पं. वि. ना. भातखंडे व पं. विष्णू दिगंबर पलुस्कर ह्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांच्या योगदानामुळे आज संगीत शाळा महाविद्यालय स्तरावर पोहोचले आहे. आजच्या काळात भातखंडे, पलुस्कर स्वरलिपी प्रचारात आहेत त्यातही भातखंडे स्वरलिपी पद्धती ही सोपी व सहज समजणारी म्हणून सर्वश्रूत आहे. त्या मानाने पलुस्कर स्वरलिपी थोडी क्लिष्ट मानल्या जाते.

परंतु भातखंडे स्वरलिपी पद्धती जरी सर्वश्रूत असली तरी त्यात काही कमतरता आहे असे खुद्द भातखंडे लिहून जातात. त्यातून आजच्या वैज्ञानिक युगात काळ झपाट्याने बदललेला आहे. त्यात आपल्या शास्त्रीय संगीताच्या प्रस्तुतीकरणातही बरेच बदल आहेत आणि ह्याच झालेल्या बदलांमुळे स्वरलिपी पद्धतीमध्ये काही भर घालून तिला समृद्ध करता आली तर ती संगीत जगताला मिळालेली मोठी देन असेल ह्याच उद्देशाने हा लघु शोध प्रबंधाचा विषय निवडण्यात आला. त्यासाठी हा विषय एकूण सहा प्रकरणात विभागण्यात आला आहे.

प्रकरण एक ह्यात प्राचीन काळातील स्वरलिपी पद्धतीचा आढावा व स्वरलिपीचा प्राचीन इतिहास देण्यात आला आहे.

प्रकरण दोन मध्ये प्रचलीत भातखंडे स्वरलिपी पद्धतीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण तीन मध्ये पं. पलुस्करांनी दिलेल्या स्वरलिपी पद्धतीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण चार मध्ये दक्षिणी स्वरलिपी पद्धतीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण पाच मध्ये स्टाफ स्वरलिपी पद्धतीचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण सहा मध्ये वर नमूद केलेल्या स्वरलिपी पद्धती शिवाय काही स्वत:शी अशी स्वरलिपी पद्धती दिलेली आहे. तिचा उल्लेख करून व काहीर मान्यवर कलाकार, बंदीशकार ह्यांच्या मुलाखती घेऊन त्यातून निष्कर्ष मांडण्यात आला आहे. ह्यासाठी प्रसिद्ध संगीतकार नंदू होनप, पं. प्रभाकरराव देशकर, डॉ. बाल पुरोहीत, पं. प्रभाकर धाकडे ह्यासारख्या कलाकारांच्या मुलाखती घेण्यात आल्यात. बंदीशकार म्हणून डॉ. मंग्रूळकर, प्रा. दिपश्री पाटील यांच्या मुलाखती घेतल्या तर आधुनिक काळातील पाश्चात्य नोटेशन वर प्रभुत्व असलेल्या खूशिर्द मसानी ह्यांची मुलाखत घेण्यात आली. तसेच पाश्चात्य स्वरलिपी अभ्यासक श्री विभास गहाणकर, तेजस्वीनी केळकर ह्यांच्या मुलाखती घेण्यात आल्यात.

पारंपारिक पठडीतून शिकलेल्या मान्यवरांनी स्वरलिपीमध्ये भर घालण्याची गरजच नाही असे मत व्यक्त केले. कारण शास्त्रीय संगीत हे ख्याली म्हणजेच स्वत:च्या विचारांनी समृद्ध करावयाचे संगीत आहे. त्यामुळे त्याला लिपीबद्ध करता येणे शक्य नाही असे मत व्यक्त केले. तर आधुनिक काळातील पाश्चात्य संगीताचे अभ्यासक ह्यांनी ह्या स्वरलिपी मध्ये अनेक त्रृटी आहेत. ह्यावर विचार विनीमय झाला नाही तर हे संगीत जीवंत राहणार नाही असाही खेद व्यक्त केला. त्यासाठी त्यांनी पाश्चात्य संगीतातील काही चिन्ह भातखंडे स्वरलिपीत उपयोगात आणता येतात. असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

या सर्व शोधातून जवळ जवळ सात ते आठ चिन्ह देण्यात आलेले आहेत. ज्याचा उपयोग आपण आपल्या स्वरलिपी मध्ये करून आपली लिपी समृद्ध करू शकू.